क्रमांक : ११०५०/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : १४ ऑगस्ट, २०२०

:: **परिपत्रक** ::

या सचिवालयातील विविध कक्षांकडून प्रस्ताव/टिप्पण्या सादर करण्यात येतात. सदर प्रस्ताव/टिप्पण्या संबंधित कक्षांकडून त्या-त्या कक्षांशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत सचिव (कार्यभार) त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार मा.पीठासीन अधिकारी यांचेकडे सादर होतात. परंतु कक्षांकडून सादर होणाऱ्या नस्त्यांना क्रमांक देण्यात येत नसल्याने या नस्त्यांचे मार्गक्रमण कसे होते याबाबत निश्चित माहिती प्राप्त होत नाही व काहीवेळा सादर केलेल्या नस्त्यांचा ठावठिकाणा लागत नाही. कक्षांकडून सादर करण्यात येणाऱ्या नस्त्यांची अचूक माहिती मिळविण्यासाठी कक्षांकडून सादर करण्यात येणाऱ्या प्रत्येक नस्तीस स्वतंत्र क्रमांक देण्याची आवश्यकता असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

नस्तीस देण्यात येणाऱ्या क्रमांकात सुसूत्रता असणे आवश्यक असल्याने टिप्पण्यांना/नस्त्यांना खालीलप्रमाणे क्रमांक देण्यात यावा :- "टिप्पणी/नस्ती क्रमांक/कक्षाचे नाव/वर्ष" (उदाहरणार्थ... ३०/अ/२०२०) याकरीता सर्व कक्षांनी प्रत्येक वर्षाकरीता त्यांच्या कक्षात नोंदवही ठेवून त्यात नोंद घेण्याची कार्यवाही करावी.

(पूनम ढगे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
७) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता).
८) निवडसूची.

D:\E drive\२०२०\Circular\Circular.doc